MHKO110002242016

## नियमित दिवाणी दावा क्र.२६/२०१६.

(CNR No.**MHKO110002242016**)

## निशाणी क्रमांक २१३ खालील आदेश

( बालेचांद मणेर वि. द्रौपदी बुरुड व इतर )

प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १८, नियम १६ नुसार साक्षीदारांचा जबाब तत्परतेने नोंदविण्यासाठी दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी यांच्या कथनांनुसार, दिनांक ०७/०५/२०२५ रोजी वादीच्या विधिज्ञांनी तत्कालीन न्यायाधीश यांच्याशी भांडण काढले होते. त्यावेळी वादीच्या विधिज्ञांनी प्रतिवादी यांच्या विधिज्ञाचे तसेच इतर विधिज्ञांची नावे घेऊन न्यायाधीश यांना अर्जावर आदेश करण्याबाबत दबाव टाकला आहे. सदरची सर्व घटना ही न्यायालयाच्या सी.सी.टी.व्ही मध्ये नोंद झाली आहे. त्यामुळे, प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे दिनांक ०७/०५/२०२५ रोजीचे दुपारी ३ ते ६ या वेळेतील कोर्ट चेंबर समोरील, पश्चिमेकडील खुल्या आवाराचे व दर्शनी भागाचे सी.सी.टी.व्ही. फुटेज व त्यासोबत भारतीय पुरावा कायदा कलम ६५(ब) नुसारचे प्रमाणपत्र हजर करण्याबाबत न्यायालयातील नाझर यांना आदेश होण्याची विनंती केली आहे.

०३. वादी यांनी **निशाणी क्र.२१७** वर प्रस्तुत अर्जासाठीचे त्यांचे म्हणणे दाखल करून सदर अर्जामधील सर्व मजकूर नाकारलेला आहे. वादी यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांच्या विरोधात कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रकरणातील तूर्तातूर्त मनाईचा आदेश मंजूर होऊन प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमधील वादी यांच्या कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करू नये असे निर्देश देण्यात आले आहेत. सदर अर्जावरील अपील मा. जिल्हा न्यायालयाने नामंजूर केले आहे. त्यानंतर वादी यांनी **निशाणी क्र.१८४** नुसार अर्ज दाखल करून पोलीस संरक्षणाची मागणी केली होती. सदरचा अर्ज दिनांक ०८/०५/२०२५ रोजी मंजूर करण्यात आला आहे. त्यानंतर प्रतिवादी यांनी दाखल केलेल्या

प्रस्तुत अर्जामध्ये साक्षीदारांचे नांव व पत्ता नमूद नाही. तसेच, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १८, नियम १६ मधील तरतुदी प्रस्तुत अर्जास लागू होत नाहीत. त्यामुळे केवळ प्रकरण प्रलंबित ठेवण्यासाठी प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. तसेच, प्रतिवादी यांच्या विधिज्ञांवर देखील अनेक फौजदारी खटले दाखल असून त्यांनी वादी यांच्या विधिज्ञांबाबत चुकीचा हेतू मनात ठेऊन सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे, वादी यांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. प्रस्तूतचा अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले.

०५. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता, **निशाणी क्र.२०४** नुसार पुनर्विचार अर्ज सादर करून **निशाणी क्र.१८४** वरील आदेशाचे पुनर्विलोकन करण्याबाबत विनंती केल्याचे प्रतिवादीचे कथन आहे. त्या अनुषंगाने तत्कालीन न्यायाधीशांबाबत वादीच्या विधिज्ञांनी केलेले शाब्दिक कथन व त्या अनुषंगाने **निशाणी क्र.१८४** वरील दिनांक ०९/०५/२०२५ रोजी दबावाखाली आदेश झाल्याचे प्रतिवादीचे कथन आहे. त्या अनुषंगाने **निशाणी क्र.२०४**, वरील प्रतिवादी यांच्या अर्जाचा गुणदोषांवर निकाल लागण्यासाठी सी.सी.टी.वही. फुटेज अत्यंत महत्त्वाचे असल्याचे नमूद करत प्रस्तुत अर्ज सादर करून, न्यायालयातील सी.सी.टी.व्ही. फुटेज पुराव्याकामी हजर करण्याबाबत आदेश होण्याकरिता विनंती केल्याचे दिसून येते

०६. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १८ नियम १६ अनुसार जर साक्षीदार न्यायालयाचे कार्यक्षेत्र सोडून जाण्याच्या स्थितीत असेल किंवा पुरेसे न्यायालयाचे समाधान होण्याइतपत कारण दिसून येत असेल तर, अशा साक्षीदाराचा पुरावा तत्परतेने घेण्याबाबत तरतूद आहे. परंतु, प्रस्तुत अर्जामध्ये **निशाणी क्र.२०४** वरील अर्जाचा गुणवत्तेवर निकाल होण्या करिता प्रस्तूतचा अर्ज सादर केल्याचे प्रतिवादीचे कथन आहे. **निशाणी क्र.२०४** वरील अर्ज हा पुनर्विचारासाठी सादर केल्याचे दिसून येते. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ११४ नुसार, पुनर्विलोकन (Review) बाबतची खालील प्रमाणे तरतूद आहे.

> *114.* ***Review.****—Subject as aforesaid, any person considering himself aggrieved—*
>
> *(a) by a decree or order from which an appeal is allowed by this Code, but from which no appeal has been preferred.*
>
> *(b) by a decree or order from which no appeal is allowed by this Code, or*
>
> *(c) by a decision on a reference from a Court of Small Causes,*
>
> *may apply for a review of judgment to the Court which passed the decree or made the order, and the Court may make such order thereon as it thinks fit.*

०७. त्यामुळे, दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ११४ चे स्वरूप मर्यादित असल्यामुळे **निशाणी क्र.२०४** वरील अर्ज चालविण्याकरिता **निशाणी क्र.२१३** मधील नमूद पुराव्याची आवश्यकता असल्याचे दिसून येत नाही. तसेच, त्याची तत्परतेने सुनावणी करण्याची आवश्यकता असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यास पात्र राहातो. करिता मी खालील आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश.</u>

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHRINIVAS ARUN KULKARNI
Date: 2026.01.17 17:45:05 +0530

**( श्रीनिवास अ. कुलकर्णी )**

दिनांक. १७/०१/२०२६. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पेठ-वडगांव.